# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## कार्यालयीन सूचना क्र. १२ /२०२०

क्र.संगाबाअवि/१/१०९/ 2-309 /२०२० दिनांक - 09 / 03 /२०२०

संदर्भः- आरोग्य अधिकारी, यांची कार्यालयीन सुचना क्र. ८/२०२० दिनांक २०/०३/२०२०

उपरोक्त संदर्भीय कार्यालयीन सुचनेच्या अनुषंगाने विद्यापीठ परिसरामध्ये कोरोना व्हायरसबाबत जाणीव, जागृत व खबरदारी घेण्याच्या दृष्टीने कार्यालयीन सुचना आरोग्य अधिकारी यांच्याकडुन निर्गमित करण्यात अलेली आहे

कोरोना व्हायरस सामान्य प्रकाचे नाक आणि घशात होणारे इन्फेक्शन आहे. कोरोना व्हायरसचे अनेक विषाणुंचे जाळे आहे. त्यानुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/ शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरात वावरतानी कोरोना व्हायरसचे जाणीव व खबरदारी घेण्याच्या दृष्टीने सर्व शैक्षणीक विभाग आणि प्रशासकिय विभागात होणारे दर दिवसाची बायोमॅट्रीक उपस्थिती पुढील आदेशा पर्यंत बंद करण्यात येत आहे असुन सर्वानी नियमीतपणे उपस्थितीपटावर स्वाक्षरी करावी.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

प्रत -

१) सर्व प्रशासकीय अधिकारी व शैक्षणिक विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (ई-मेल द्वारे) त्यांनी, सदर कार्यालयीन सुचनेची नोंद घ्यावी. तसेच सदर सुचना त्यांचे अधिनस्त शिक्षक/अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी.( सोबत आरोग्य अधिकारी यांनी निर्गमित केलेली कार्यलयीन सुचना ८/२०२० जोडलेली आहे.)
२) आरोग्य अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
३) स्विय सहाय्यक, मा.कुलगुरु कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४) स्विय सहाय्यक, मा.प्र-कुलगुरु कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
५) स्विय सहाय्यक, कुलसचिव कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
६) वार्डन मुलांचे/मुलींचे वसतीगृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव(आस्था),
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कार्यालयीन सूचना क्र.१३ /२०२०

क्र.संगाबाअवि/१/१०९/१-३६६/२०२०

दिनांक - १३/०३/२०२०

संदर्भः- १)सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क्र. D.O.NO.F.NO.१-१४/२०२०{Webesite} दिनांक ०५/०३/२०२०

२) सहा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/कोरोना/२०२०/१४१ दिनांक ११/०३/२०२०

३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र.उशिंस/कोरोना/मवि-१/२०२०/३५३३/२०२० दिनांक ०९/०३/२०२०

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठ परिसरामध्ये कोरोना व्हायरसबाबत जाणीव, जागृत व खबरदारी घेण्याच्या दृष्टिने सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व सहा.संचालक, तंत्रशिक्षण मुंबई, आणि शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे, यांचे पत्र सोबत जोडलेले आहे. यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

तसेच त्यानुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/ शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरात वावरतांना कोरोना या संसर्गजन्य विषाणुच्या प्रतिरोधात्मक उपाययोजना व खबरदारी घेण्याच्या दृष्टिने सर्व शैक्षणिक विभाग आणि प्रशासकीय विभागात होणारे विविध कार्यक्रम(कार्यशाळा/ सांस्कृतिक कार्यक्रम/स्नेह संमेलन इत्यादी गर्दी होणारे कार्यक्रम) दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत स्थगित करावेत.

स्वा/-

कुलसचिव,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रत महितीस्तव सादर (ई-मेल द्वारे) :-**

१) सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, बहादुरशाह जफर मार्ग, नई दिल्ली -११०००२

२) सहा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत महिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता (ई-मेल द्वारे):-

१) सर्व प्रशासकीय अधिकारी व शैक्षणिक विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

त्यांनी, सदर कार्यालयीन सुचनेची नोंद घ्यावी. तसेच सदर सुचना त्यांचे अधिनस्त शिक्षक/अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी.( सोबत सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली व सहा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई आणि शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र जोडलेले आहे.)

२) सर्व संचालक/ समन्वयक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

३) आरोग्य अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

४) स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

५) स्वीय सहाय्यक, मा.प्र-कुलगुरु कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

६) स्वीय सहाय्यक, कुलसचिव कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

७) वार्डन मुलांचे/मुलींचे वसतीगृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव(आस्था),

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कार्यालयीन सूचना क्र.१४/२०२०

क्र.संगाबाअवि/१/१०९/१-३७०/२०२० दिनांक : १५ मार्च, २०२०

संदर्भ : १) उपसचिव, म.शा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/(सं.क.११४/२०)/विशि-१, दि.१४.३.२०२०

२) शिक्षण संचालक,शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.क्र.उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि. १४ मार्च २०२०

३) सहसंचालक (तंत्र शिक्षण) अमरावती ह्यांचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/कोरोना/२०२०/७३२, दि.१४.३.२०२०

४) सहसंचालक,(उ.शि.), अमरावती ह्यांचे पत्र क्र.सरां/उशि/न्याप्र/अमती/२०२०/१४४४, दि.१५.३.२०२०

सदर्हू कार्यालयीन सूचनेव्दारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, कोरोना (कोव्हिड १९) या विषाणुच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने प्राप्त निर्देशानुसार खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

(१) विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागामधील कामकाज दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद राहील. मात्र सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरू राहील.

(२) विद्यापीठ परिसरातील वसतिगृहात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना सदर कालावधीत त्यांच्या मूळ गावी जाण्याचा पर्याय उपलब्ध आहे. जे विद्यार्थी या काळात वसतिगृहात राहतील त्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शक्यतो वसतिगृहाबाहेर जाऊ नये.

(३) विद्यापीठांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. वर जे बंधन घालण्यात आलेले आहे ते परीक्षार्थी विद्यार्थी/विद्यार्थीनींना लागू राहणार नाही. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षेबाबत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल.

(४) परीक्षेचा अपवाद वगळता विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यापीठात येणार नाहीत अशा सुचना संबंधित विभाग प्रमुखांनी निर्गमित कराव्यात.

(३) प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या खालील सुविधा सदर कालावधीत बंद राहतील.

- ग्रंथालयातील पुस्तकांची देवाण-घेवाण
- परीक्षक वसतीगृह
- सर्व क्रीडा सुविधा
- जलतरण तलाव
- परिसरातील सर्व अध्यासने/अभ्यासक्रमे/ सर्व केंद्र
- वाचन कक्ष
- कमवा व शिका योजना
- उद्यान
- परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अध्ययन केंद्र

(४) विद्यापीठ परिसरातील सर्व बायोमॅट्रीक व्यवस्था पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.

(५) विद्यार्थी/विद्यार्थीनींना सुटी दिलेली आहे ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत. तसेच, वसतिगृहामध्ये, त्यांच्या घरामध्ये स्वतःला सुरक्षित ठेवतील. तसेच, ते अनावश्यक फिरणार नाही, अशा स्पष्ट सुचना विभाग प्रमुखांनी देण्यात याव्यात. अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

(६) वसतीगृहातील/शैक्षणिक विभागातील जे विद्यार्थी/विद्यार्थीनी आजारी आहेत ते इतरांच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घेणे.

(७) विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक यांनी सदर कालावधीत सार्वजनिक समारंभ, गर्दीची ठिकाणे अथवा अशा जागांपासून दूर राहावे. तद्वतच, विविध राष्ट्रीय-राज्यस्तरीय परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा, मुलाखती, स्नेहसंमेलने, निरोप समारंभ याचे आयोजन तुर्तास पुढे ढकलण्यात यावे.

स्वा./-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव

*प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-*

१) विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२) सर्व प्रशासकीय अधिकारी
३) संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा

४) वार्डन, मुला/मुलींचे वसतीगृह
४) समन्वयक/संचालक, सर्व अध्यासने/अभ्यासक्रमे/ सर्व केंद्र
५) समन्वयक, जलतरण तलाव
५) संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र
६) परीक्षा मार्गदर्शन केंद्र
७) समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अध्ययन केंद्र
८) संचालक, शा.शिक्षण व क्रीडा
९) समन्वयक, सेक्युरिटी
१०) प्रभारी, सुरक्षा अधिकारी

(प्र.वा.राठोड)
उपकुलसचिव (रा.प्र.वि.)

प्रतिलीपी-
१) स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरू कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) स्वीय सहाय्यक, मा.प्र-कुलगुरू कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
३) स्वीय सहाय्यक, मा.कुलसचिव कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## परिपत्रक

क्र.संगाबाअवि/१/१०९/१-३८२/२०२० दिनांक : १७ मार्च, २०२०

**विषय : राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..**

संदर्भ : १) उपसचिव, म.शा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/(सं.क.११४/२०)/विशि-१, दि.१४.३.२०२०

२) शिक्षण संचालक,शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.क्र.उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि. १४ मार्च २०२०

३) सहसंचालक (तंत्र शिक्षण) अमरावती ह्यांचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/कोरोना/२०२०/७३२, दि.१४.३.२०२०

४) सहसंचालक,(उ.शि.), अमरावती ह्यांचे पत्र क्र.ससं/उशि/न्याप्र/अमती/२०२०/१४४४, दि.१५.३.२०२०

५) कार्या.सूचना क्र.संगाबाअवि/१/१०९/१-३७०/२०२०, दि.१५.३.२०२०

६) परिपत्रक क्र.संगाबाअवि/८/सी-५२२/२०२०, दि.१५.३.२०२०

७) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दि.१६.३.२०२०

वरील विषयाबाबत संदर्भ क्र. ५ व ६ वरील सूचनेव्दारे विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग आणि संलग्नित महाविद्यालयांना कोरोना (कोव्हिड १९) या विषाणुच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. संदर्भ क्र.७ वरील शासन पत्रान्वये खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केले आहेत.

(१) संदर्भ क्र.१ वरील शासन पत्रान्वये दिलेल्या सूचना लक्षात घेता, नागरी भागासोबतच राज्यातील ग्रामीण भागातील सर्व सहकारी / अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/ अकृषि विद्यापीठे/ तंत्रज्ञान विद्यापीठे/ तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/ औषधीनिर्माणशास्त्र महाविद्यालये/वसतिगृहे दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद राहतील.

(२) तंत्रशिक्षण /उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषि विद्यापीठे/ तंत्रशास्त्र विद्यापीठे / सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/ सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानि, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित/ मॉडेल डिग्री महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ वसतीगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/ वसतीगृहे दिनांक ३१.३.२०२० पर्यंत बंद राहतील.

(३) राज्यातील सर्व सरकारी/ अनुदानित/ खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/ अकृषी विद्यापीठे/ तंत्रशास्त्र विद्यापीठे/ तंत्रनिकेतने/ अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ कला महाविद्यालये यांचे दिनांक ३१.३.२०२० पर्यंत होणाऱ्या सर्व परीक्षा व प्रात्यक्षिके पुढे ढकलण्यात येत आहेत. दिनांक १.४.२०२० पासूनची परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील.

(४) सर्व सरकारी/अनुदानित/ खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/ अकृषी विद्यापीठे/ तंत्रशास्त्र विद्यापीठे/ तंत्रनिकेतन/ अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ कला महाविद्यालये या मधील सर्व अध्यापक हे दिनांक २५.३.२०२० पर्यंत घरी राहून कामकाज (Work from Home) करू शकतील.

तथापि, आपात्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास/ प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठाचे कुलगूरू/प्र-कुलगुरू/ कुलसचिव/ उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनाचे प्राचार्य/ संचालक/ अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीन हजर राहणे बंधनकारक राहील.

(५) विद्यापीठाचे कुलगुरू/ प्र-कुलगुरू/ कुलसचिव/ उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनाचे प्राचार्य/ संचालक/ अधिष्ठाता व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

(६) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिनांक ३१.३.२०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत.

(७) उपरोक्त उपाययोजनाबाबत आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीच्या सूचना वेळोवेळी देण्यात येतील.

वरील विषयासंदर्भात शासनाचे दिनांक १६.३.२०२० रोजीच्या आदेशास अनुसरून मा.कुलगुरूंनी दिलेल्या निर्देशान्वये सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त शासनादेशाचे तंतोतंत पालन करण्यात यावे. विद्यापीठाद्वारे वरील विषयासंदर्भात यापुर्वी निर्गमित केलेल्या संदर्भ क्र.५ व ६ वरील कार्यालयीन सूचना/परिपत्रकातील सूचना यानंतर देखील लागू राहतील याची सर्व संबंधीतांनी कृपया नोंद घ्यावी व यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विद्यापीठास तातडीने सादर करावा.

(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*(क्र.मा.प.*

*प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-*

१) प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२) विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) सर्व प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
४) संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा
५) वार्डन, मुला/मुलींचे वसतीगृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
६) समन्वयक/संचालक, सर्व अध्यासने/अभ्यासक्रमे/ सर्व केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
७) समन्वयक, जलतरण तलाव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
८) संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
९) परीक्षा मार्गदर्शन केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
१०) समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अध्ययन केंद्र
११) संचालक, शा.शिक्षण व क्रीडा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
१२) समन्वयक, सेक्युरिटी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
१३) प्रभारी, सुरक्षा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
१४) स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरू कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
१५) स्वीय सहाय्यक, मा.प्र-कुलगुरू कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
१६) स्वीय सहाय्यक, मा.कुलसचिव कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(प्र.वा.राठोड)
उपकुलसचिव (सा.प्र.वि.)

*प्रतिलीपी माहितीस्तव -*

१) उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.
४) सहसंचालक, तंत्र शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**कार्यालयीन सूचना क्र.१९/२०२०**

क्र.संगाबाअवि/१/१०९/१-३९८/२०२० — दिनांक :- १९.०३.२०२०

संदर्भ - १) शासन निर्णय क्र.समय-२०२०/प्र.क्र.३५/१८(र.व.का.), दि.१८.३.२०२०
२) उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दि.१९.३.२०२०

जगभरातील अनेक देशात कोरोना विषाणूंचा प्रसार झाला आहे. कोरोना विषाणू बाधीत रुग्ण आपल्या देशातील काही ठिकाणी आढळून आले आहेत. कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तातडीने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने शासकिय कार्यालयांची तातडीची व महत्त्वाची कामे चालू राहण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय तसेच शासन पत्रान्वये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकिय अधिकारी, संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच प्र.संचालक,मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा यांना खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) दि.२०.३.२०२० ते ३१.३.२०२० या कालावधीसाठी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकिय विभाग तसेच मॉडेल डिग्री कॉलेज यामधील अधिकारी, कर्मचारी, दैनिक वेतनिक व सेवानिवृत्त कर्मचारी यांची दैनंदिन उपस्थिती आळीपाळीने ५० टक्के राहील, यादृष्टीने संबंधित शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकिय अधिकारी/प्र.संचालक यांनी आपल्या स्तरावर नियोजन करावे व यासंदर्भात आपआपल्या विभागातील ५० टक्के अधिकारी व कर्मचारी आळीपाळीने कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचारी/दैनिक वेतनिक/सेवानिवृत्त कर्मचारी यांची यादी सोबत जोडलेल्या प्रपत्रात दि.२०.३.२०२० रोजी दु.२.०० वाजेपर्यंत reg@sgbau.ac.in या इ-मेल वर न चुकता सादर करावी.
२) दि.२०.३.२०२० ते ३१.३.२०२० या कालावधीसाठी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची दैनंदिन उपस्थिती आळीपाळीने ५० टक्के राहील, यादृष्टीने संबंधित प्राचार्यांनी आपल्यास्तरावर नियोजन करावे.
३) सदर सूचना ह्या आरोग्य केंद्रामध्ये तसेच सुरक्षा विभागामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत.
४) उपरोक्तप्रमाणे ज्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सुट मिळेल, त्यांनी त्यांची प्रलंबित राहिलेली कामे कार्यालयीन उपस्थितीचे दिवशी पूर्ण करावीत.

आदेशान्वये-

(डॉ.तु.रा.देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव-**

१) सर्व प्रशासकिय अधिकारी तथा शैक्षणिक विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (इ-मेल द्वार)
२) प्र.संचालक,मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा
३) समन्वयक/संचालक/अध्यासन प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४) वार्डन, मुलांचे/मुलींचे वसतीगृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
५) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
६) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (मार्फत उपकुलसचिव (मवि.)) (इ-मेलद्वारे)

(कृ.मा.प.)

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**प्रपत्र**

**आळीपाळीने कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचारी/दैनिक वेतनिक/सेवानिवृत्त कर्मचारी इ.ची माहिती**

शैक्षणिक/प्रशासकिय विभागाचे नाव-

अधिकारी/कर्मचारी/दैनिक वेतनिक/सेवानिवृत्त कर्मचारी यांची एकूण संख्या -

**दि.२०.३.२०२० ते ३१.३.२०२०**

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी/दैनिक वेतनिक/सेवानिवृत्त कर्मचारी यांचे नाव | उपस्थिती दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

नियंत्रण अधिकाऱ्यांची स्वाक्षरी